Downloaded from SkillCouncils.com

कौशल्यम् बलम्

# महाराष्ट्र शासन

## जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,बुलढाणा

प्रशासकीय इमारत, तळ मजला, बस स्थानक समोर
बुलडाणा-४४३००१

दूरध्वनी क्र.: ०७२६२-२४२३४२ संकेतस्थळ : www.mahaswayam.gov.in ई-मेल: buldanarojgar@gmail.com

जा.क्र.जिकौविरोवउमाकेजा/कौवि/PM-GKVK /२०२४-२५/643-48 दि. ३१ मार्च, २०२५

ईमेलद्वारे-

प्रति,
संचालक
स्वतंत्र प्रशिक्षण भागीदार (TP)
सर्व जिल्हा बुलढाणा.

**विषय : बुलढाणा जिल्ह्यात प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र (PMGKVk) योजनेअंतर्गत प्रशिक्षण राबविण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण भागीदार (TP) यांचेकडून प्रस्ताव मागविणेबाबत.**

**संदर्भ :** १) मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे पत्र जा.क्र. MSSDS/PMKUVA/२०२३-२४/१०८० दि.२४/०८/२०२३.

२) मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे पत्र जा.क्र. MSSDS/PMGKVK/२०२४-२५/१२२४ दि.११/०३/२०२४.

३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे पत्र जा.क्र. MSSDS/२०२४-२५/१५ दि.०२/०१/२०२५.

४) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती बुलढाणा बैठक दि.२८.०१.२०२५ चे इतिवृत्त दि.२९/०१/२०२५ रोजीची मंजूर टिपणी.

मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी सन २०२३ - २४ करिता सादर केलेल्या अर्थसंकल्पातील कौशल्य विकास विभागांतर्गत अर्थसंकल्पातील परिच्छेद क्र. ११२ मध्ये केलेल्या तरतुदीन्वये ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतराचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगाराकरिता ग्रामीण भागात ५११ "प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र" निर्माण करण्यास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) ची प्रक्रिया पूर्ण करून गठीत समितीमार्फत पात्र ५१ प्रशिक्षण संस्थांची जिल्हानिहाय ५११ गावांची **"प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र"** करीता निवड करण्यात आली आहे. त्यानुषंगाने बुलढाणा जिल्हा येथे १६ गावामध्ये **"प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र"** करीता निवड करण्यात आली आहे.

उक्तअनुषंगाने, संदर्भ १ अन्वये **"प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र"** करिता निवड करण्यात आलेल्या संस्थेचे ५ प्रशिक्षण केंद्र **१) देऊळगांव मही ता. देऊळगांव राजा २) साखर खेर्डा ता. सिंदखेडराजा ३) सुटाळा बु. ता. खामगांव ४) वडनेर भोलजी ता.नांदुरा ५) वरवट बकाल ता. संग्रामपुर** रद्द करण्यात आलेली आहे.

संदर्भ ३ अन्वये वरील पाच प्रशिक्षण केंद्रासाठी मिळालेल्या मार्गदर्शन सुचनाप्रमाणे नवीन संस्था निवडण्याची प्रक्रिया राबविण्यासाठी मान्यता मिळाली आहे. त्याप्रमाणे, प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी आपण इच्छुक असल्यास सोबत दिलेल्या परिशिष्टाप्रमाणे (संस्थेचे प्रत्येक कागदपत्रांवर पृष्ठाकींत करुन सही व शिक्क्यासह ) प्रस्ताव सादर करावा.

कृ.मा.प.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Downloaded from SkillCouncils.com

सदरचा प्रस्ताव हा प्राथमिक स्वरुपात मागविण्यात येत असून सदर बाबत अतिरिक्त सुधारित प्रस्तावाबाबत प्रक्रिया करणे अथवा सदरचा प्रस्ताव रद्द करणे याबाबत कार्यालय अथवा वरिष्ठ स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

तरी आपण (प्रशिक्षण भागीदार (TP)) दिनांक **३१ मार्च २०२५ ते ११ एप्रिल २०२५ पर्यंत** या कार्यालयास **(जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, तळ मजला, बस स्थानक समोर बुलडाणा येथे)** दोन प्रतीत प्रस्ताव सादर करावा.

**सोबत:- १. परिशिष्ठ १**

(ग.प्र.बिटोडे)
**सहायक आयुक्त,**
**कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता,**
**बुलढाणा.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

**१.मा. आयुक्त,** कौशल्य विकास रोजगार व उदयोकता आयुक्तालय, **नवी मुंबई.**
**२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,** महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, **मुंबई.**
**३.मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती, **बुलढाणा.**
**४.मा. उप आयुक्त,** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, **अमरावती.**
**५.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी बुलढाणा.**

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Dowmloaded from SkillCouncils.com

परिशिष्ठ १

१. प्रमोद महाजन ग्रामीणकौशल्य विकास केंद्रासाठी शासकीय संस्थांना प्राध्यान्य देण्यात यावे.
२. अर्जदार हा नोंदणीकृत स्वतंत्र कायदेशीर संस्था असणे आवश्यक आहे जसे की भागीदारी कायदा (Partnership Act) १९३२ अंतर्गत भागीदारी फर्म (Partnership Firm), LLP कायदा (LLP Act) २००८ अंतर्गत मर्यादित दायित्व भागीदारी Limited Liability Partnership (LLP), कंपनी कायदा (Companies act) १९५६ किंवा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत खाजगी मर्यादित कंपनी (Private Limited Company), पब्लिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) अंतर्गत नोंदणीकृत कंपनी कायदा १९५६ किंवा २०१३, सोसायटी नोंदणी अंतर्गत कायदा, १८६० किंवा बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० नोंदणीकृत संस्था.
३. अर्जदाराने अर्ज केलेल्या ठिकाणांच्या संख्येनुसार मागील ४ वर्षांपैकी कोणत्याही २ वर्षात (आर्थिक वर्ष २३-२४, आर्थिक वर्ष २२-२३, आर्थिक वर्ष २१-२२, आर्थिक वर्ष २०-२१ ) अर्जदाराची सरासरी वार्षिक उलाढाल प्रति ठिकाण रु.१० लाख किंवा त्याहून अधिक असावी.
४. शासकीय किंवा निमशासकीय किंवा इतर सक्षम संस्थांमध्ये अर्जदार हा काळ्या यादीत समाविष्ट असू नये.
५. अर्जदार हा Training Partner म्हणून Skill India Digital पोर्टल वर सूचीबद्ध झालेला असावा अथवा Skill India Digital पोर्टलवर सदर संस्थेस विहित सूचीबद्ध होण्यासाठी कोणतही अडचण येणार नाही याबाबत त्यांना खात्री असावी.
६. अर्जदारास कौशल्य विकासाच्या क्षेत्रातील प्रकल्प अंमलबजावणीचा अनुभव असावा.
७. अर्जदाराने अल्पकालीन प्रशिक्षण (STT) मध्ये किमान ३०० उमेदवारांना प्रशिक्षित केलेले असावे.
८. अर्जदाराने उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार दिलेला असावा.
९. अर्जदाराने Placement Linkages/Industry Tie-up केलेला असावा.
१०.अर्जदारास New-age jobs and Green jobs मधील प्रशिक्षणाचा अनुभव असावा.
११. अर्जदारास कौशल्यासाठी कोणताही पुरस्कार मिळाला असेल तर प्राधान्य देण्यात यावे.

टिप :- वरील मुद्यापैकी काही बाबतीत त्या त्या जिल्ह्यातील परिस्थितीनुसार बदल करण्याची मुभा संबधित जिल्हाधिकारी यांना राहील.

सहाय्यक आयुक्त
जिल्हा कौशल्य विकास रोजगार व
उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com